# ई - पोलीस पत्रिका

दि १०/०४/२०२४ अनु.क्र.६६

## (अमरावती शहर पोलीसांची २०२४ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबल युक्तव तणाव मुक्त पोलीस दल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडू न देणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.
- “सुरक्षित व सुखकर अमरावती” हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोक सहभागातून साध्य करू.

# भाग-१

## पदोन्नती/बदली /प्रशिक्षण/रजा

## बदली

**०१.पोआअ/पशा-१/लो.स.नि.२०२४/पोउपनि-हजर/२४१३/२०२४ अमरावती शहर दिनांक ०४/०३/२०२४**

## आदेश

मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे आदेश क्रमांक पोमसं/५/१०/लो.नि.-२०२४/पोउपनि बदली/ ०७/ २०२४, दिनांक २६/०२/२०२४ अन्वये खालील नमुद नि:शस्त्र पोलीस उपनिरीक्षक यांची नागपूर शहर येथून अमरावती शहर अशी बदली करण्यात आलेली आहे.

पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे आदेश क्रमांक : पोआना /जी-५(१)/लो.स.नि.-२०२४/पोउपनि बदली कार्यमुक्त / २०२४ २८२३ दिनांक २८/०२/२०२४ अन्वये खालीलनमुद पोलीस उप निरीक्षक**यांना नागपूर शहर व छत्रपती संभाजी नगर येथून दिनांक २९/०२/२०२४ चे म.नंतर बदलीवर कार्यमुक्त केल्याने ते** अमरावती शहर घटकातदिनांक ०४/०३/२०२४ रोजी म.पूर्व बदलीवर हजर झाले आहेत. या घटकात त्यांना हजर करुन घेण्यात येत असुन त्यांचे नावासमोर नमुद केलेल्या ठिकाणी त्यांची नेमणुक करण्यात येत आहे.

| अ. क्र. | आदेशातील अ.क्र. | पोलीस उपनिरीक्षक यांचे नाव | बदली पुर्व नेमणुकीचे ठिकाण | अमरावती शहर येथे नविन नेमणुकीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | १३१ | अशोक सुखदेव वाघ | नागपूर शहर | **पो.स्टे. भातकुली, अमरावती शहर** |
| २ | १३३ | अनिल डोमाजी मांगलकर | नागपूर शहर | **पो.स्टे. खोलापूरी गेट, अमरावती शहर** |
| ३ | १४३ | नरेश मुरलीधर गिरघुसे | नागपूर शहर | **पो.स्टे. कोतवाली, अमरावती शहर** |
| ४ | १५५ | निलकंठ अजाबराव श्रीराव | नागपूर शहर | **विशेष शाखा, अमरावती शहर** |
| ५ | १८५ | सर्जेराव आत्माराम सानप | छत्रपती संभाजी नगर शहर | **पो.स्टे. बडनेरा, अमरावती शहर** |

मा.पोलीस महासंचालक, म. रा. मुंबई यांचे बदली आदेश दि. २६.०२.२०२४ मध्ये नमुद प्रमाणे, बदली झालेले पोलीस अधिकारी यांनी पदग्रहण अवधी न उपभोगता तात्काळ बदलीचे ठिकाणी हजर होणेबाबत दिलेल्या सुचनानुसार सदर पोलीस उपनिरीक्षक यांनी पदग्रहण अवधी न उपभोगता दि. ०४.०३.२०२४ रोजी हजर झालेले आहे. त्यामुळे महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ (पदग्रहण अवधी) मधील नियम १४ अन्वये त्यांना मंजुर ०४ दिवस पदग्रहण अवधी त्यांचे रजा खातेमध्ये जमा करण्यात येईल.

उपरोक्त नमुद पोलीस उप निरीक्षक यांनी नेमणुकीचे ठिकाणी तात्काळ हजर होऊन त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**०२.पोआअ/पशा-१/निवडणुक २०२४ बदली/अति.कार्य/२५५७/२०२४ अमरावती शहर दिनांक ०६/०३/२०२४**

## आदेश

मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे आदेश क्रमांक पोमसं/३/१०/६ निवडणुक आयोग-सुचना/१९०/ २०२३, दिनांक ०४/०३/२०२४ अन्वये खालील नमुद नि:शस्त्र पोलीस निरीक्षक यांची मा. पोलीस महासंचालक, म. रा.मुंबई यांचे दि. ३१/०१/२०२४ चे आदेशान्वये झालेली बदली रद्द करण्यात आली असून त्यांना पुर्वीच्या घटकात हजर होण्याचे आदेश दिले आहेत.त्याअनुषंगाने खालील नमुद पोलीस निरीक्षक यांना पूर्वीच्या **घटकात हजर होण्याकरीता** अमरावती शहर आयुक्तालयाचे आस्थापनेवरुन **दिनांक ०५/०३/२०२४ चे म. नंतर कार्यमुक्त** करण्यात आले आहे.

कार्यमुक्त करण्यात आलेले खालिल प्रभारी पोलीस अधिकारी यांचे पदाचे अतिरिक्त कार्यभार त्यांचे नावासमोर दिलेल्या पोलीस अधिकारी यांचेकडे तात्पुरत्या स्वरुपात पुढील आदेशापर्यंत सोपविण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस अधिकारी यांचे नांव व पदनाम | नेमणुक | कार्यभार तात्पुरत्या स्वरुपात सोपविण्यात आलेल्या पोलीस आधिकारी यांचे नांव व पदनाम व सद्याची नेमणुक |
|---|---|---|---|
| ०१ | श्री.अनिरुध्द पुरी, पोलीस निरीक्षक | विशेष शाखा शाखा, अमरावती शहर | श्री. बाबाराव अवचार, पोलीस निरीक्षक, अ. मा. वा. प्र. कक्ष, अमरावती शहर |

**०३.पोआअ/पशा-१/लो.स.नि.२०२४/पोउपनि-हजर/३७५४/२०२४ अमरावती शहर दिनांक ०८/०३/२०२४**

## आदेश

मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे आदेश क्रमांक पोमसं/५/१०/लो.नि.-२०२४/पोउपनि बदली/ ०७/ २०२४, दिनांक २६/०२/२०२४ अन्वये खालील नमुद नि:शस्त्र पोलीस उपनिरीक्षक यांची नागपूर शहर येथून अमरावती शहर अशी बदली करण्यात आलेली आहे.

पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे आदेश क्रमांक : पोआना /जी-५(१)/लो.स.नि.-२०२४/पोउपनि बदली कार्यमुक्त / २०२४/२८२३ दिनांक २८/०२/२०२४ अन्वये खालीलनमुद पोलीस उप निरीक्षक यांना कार्यमुक्त करण्यात आले असून तेअमरावती शहर घटकातदिनांक ०८/०४/२०२४ रोजी म.पूर्व बदलीवर हजर झाले आहेत. या घटकात त्यांना हजर करुन घेण्यात येत असुन त्यांचे नावासमोर नमुद केलेल्या ठिकाणी त्यांची नेमणुक करण्यात येत आहे.

| अ. क्र. | आदेशातील अ.क्र. | पोलीस उपनिरीक्षक यांचे नाव | बदलीपुर्व नेमणुकीचे ठिकाण | अमरावती शहर येथे नविन नेमणुकीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| २ | १५४ | किर्ती प्रविण आवळे (वाघधरे) | नागपुर शहर | अमरावती शहर दि. ०८/०४/२०२४ रोजी म.पूर्व हजर **नेमणुकीचे ठिकाण - न्यायालयीन पैरवी कक्ष, अमरावती शहर** |

उपरोक्त नमुद पोलीस उपनिरीक्षक यांचा दि. २७.०२.२०२४ ते ०७.०४.२०२४ पर्यंत एकुण ४१ दिवसांचा रुग्णनिवेदन कालावधी परिवर्तित रजा म्हणून नियमित करण्यात येत आहे.

श्रीमती आवळे, पोउपनि यांनी नेमणुकीचे ठिकाणी तात्काळ हजर होऊन त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

## भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरणे

### शिक्षा

**०१.पोआअ/विचौ-२/कसुरी/गैरहजर/अंतिम आदेश/पोना-११०६ सोंळके/३६०६/२०२४ अमरावती शहर दिनांक ०४/०४/२०२४**

**--००--**

**संदर्भ क्रमांक :-** १) पोलीस निरीक्षक, शहर वाहतुक शाखा (पश्चिम), अमरावती शहर यांचे कडील जावक क्रमांक २७०/२०२३, दिनांक २८/०४/२०२३ रोजीचा गैरहजर कसुरी अहवाल.

२) या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस क्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी/गैरहजर/का.दा.नो./नापोकॉ-११०६ सोळंके/७२८९/२०२३ अमरावती शहर, दिनांक २१/०६/२०२३.

**कसुरदारचे नाव :-** पोना/११०६ विनोद सोळंके, नेमणुक शहर वाहतुक शाखा (पश्चिम), अमरावती शहर.

**थोडक्यात कसुर :-**

तुम्ही नापोकॉ/११०६ विनोद सोळंके, शहर वाहतुक शाखा (पश्चिम), अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन दिनांक २४/०१/२०२३ पासुन ते दिनांक १४/०३/२०२३ पर्यत एकुण ५० दिवस वरिष्ठांना कोणतीही पुर्व सुचना न देता कर्तव्यावरुन गैरहजर राहिले होते. तसेच तुम्ही डयुटी दरम्यान गैरहजर राहण्याचे सवयीचे असुन तुम्हाला वरिष्ठांनी नेमुन दिलेले कर्तव्य व्यवस्थीत पार न पाडता कर्तव्यावर गैरहजर राहता.तुम्ही शिस्तीच्या पोलीस खात्यासारख्या दलामध्ये कर्तव्यावर असुन अशोभनीय असे वर्तन केले आहे.तरी तुमचे हे कृत्य निष्काळजीपणाचे व बेजबाबदारपणाचे असुनतुम्ही तुमचे कर्तव्यात हलगर्जीपणा/निष्काळजीपणा केलेला आहे.

अशा प्रकारे तुम्ही उपरोक्त प्रकरणी कसुरी केल्याने तुमच्या या गैरवर्तन कसुरी बद्दल तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (४) चे तरतुदी नुसार **रु. ५०००/- दंडाची शिक्षा का** करण्यात येवु नये **?** म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती.सदर कारणे दाखवा नोटीस तुम्ही दिनांक ०३/०७/२०२३ रोजी स्विकारली असुन त्यावर तुमचे स्पष्टीकरण सादर केलेले नाही. तरी तुम्ही कारणे दाखवा नोटीसचे स्पष्टीकरण सादर न केल्याने पुन्हा पोआअ/विचौ-२/का.दा.नो./स्पष्टीकरण-अप्राप्त/नापोकॉ-११०६ सोळंके/८३१०/२०२३ अमरावती शहर, दिनांक १९/०७/२०२३ अन्वये स्पष्टीकरण सादर करणे करीता पत्राव्दारे एक संधी देण्यात येवुन सुध्दा तुम्ही स्पष्टीकरण सादर केलेले नाही. तसेच तुम्हाला दिनांक ३१/०१/२०२४ रोजी तुमचे प्रत्यक्ष मौखीक म्हणणे ऐकुण घेण्याकरीता मा.पोलीस उपायुक्त (मुख्या.), अमरावती शहर यांचे आज्ञांकित कक्षेत समक्ष बोलविण्यात आले असता तुम्ही आज्ञांकित कक्षेत हजर न होता आज्ञांकित कक्षेत गैरहजर राहिले आहेत.तुम्हाला पुढील कर्तव्यात कामामध्ये सुधारणा करण्याची एक संधी देण्यात येवुन प्रस्तावित कारणे दाखवा नोटीस मध्ये देण्यात आलेल्या शिक्षेमध्ये अंशत: बदल करुन खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>अंतिम आदेश</u>

वर नमुद कसुरदार यांनाउपरोक्त कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (४) चे तरतुदी नुसार "**रु. ३०००/- दंडाची शिक्षा देण्यात येत आहे.** उपरोक्त शिक्षेने कसुरदार व्यस्थीत होत असल्यास सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ६० दिवसाच्या आत मा.अपर मुख्य सचिव गृह विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई यांना या कार्यालयाचे मार्फतीने अपिल अर्ज दोन प्रतित सादर करु शकता.

**०२.पोआअ/विचौ-१/नि.का.अं.आ./पोशि-२३० मुकेश यादव/३७०७/२०२४ अमरावती शहर दिनांक ०८/०४/२०२४**

**संदर्भ :-** १) क्र.पोआअ/विचौ/निलंबन/गुन्हा दाखल/मुकेश यादव/३९५०/२०२० दि.२५/०७/२०२०
२) क्र.पोआअ/विचौ-१/निलंबन मुक्त/पोउपनि चव्हाण+१/५६९/२०२१ दि.२१/०१/२०२१

**विषय :-निलंबन कालावधी निश्चित करणे बाबत...**

**--ooo--**

उपरोक्त संदर्भान्कीत विषयान्वये पोशि/२३० मुकेश भैयालाल यादव, नेमणूक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथे नेमणूकीस असून त्यांचे विरुध्द पोलीस स्टेशन गाडगेनगर, अमरावती शहर येथे अप.क्र. ६१५/२०२० कलम ३६३, ३७६ (२) (एन), ३५४ (ड), ४०६, ५०४, ५०६ भा.द.वि. चा गुन्हा दाखल झाला होता त्यांना या कार्यालयाचे आदेश क्र.पोआअ/विचौ/निलंबन/गुन्हा दाखल/ मुकेश यादव/३९५०/२०२० दि.२५/०७/२०२० अन्वये निलंबीत करण्यांत आले होते तसेच आदेश क्रमांक.क्र.पोआअ/विचौ-१/निलंबन मुक्त/पोउपनि चव्हाण+१/५६९/ २०२१ दि.२१/०१/२०२१ अन्वये निलंबनातून मुक्त करण्यांत आले आहे.

तरी त्यांचामहाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी,स्वीयोत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतुन काढुन टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील ७२ (१) (बी) नुसार दिनांक २५/०७/२०२० पासून ते दिनांक २१/०१/२०२१ पावेतो निलंबन कालावधी हा**"जसाचे तसा"(As Such)**करण्यात येत आहे.

## <u>सेवानिवृत्त</u>

**०१.पोआअ/आस्था-वेनिलि/सेनि आदेश/३७०१/२०२४ अमरावती शहर दिनांक ०८/०४/२०२४**

**संदर्भ** :- याकार्यालयाचे अधीसुचना क्र.पोआअ/आस्था-वेनिलि/नि.व.सेवानिवृत्त/ ९३०२/२०२३, दि.११.०८.२०२३

## <u>आदेश</u>

पोलीस आयुक्त, अमरावती शहर, आस्थापनेवरील खालील नमुद पोलीस अंमलदार यांचे वयाची ५८ वर्ष पुर्ण झाल्याने त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम १० (१) आणि महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक सेनिवे/१०९९/३४/सेवा-४, दिनांक ०२.०२.१९९९ अन्वये <u>**दि.३०.०४.२०२४** चे मध्यान्होत्तर</u> <u>**पासून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करण्यात येत आहे**</u>.

| अ.क्र. | अंमलदाराचे नाव | पदानाम व बक्कल क्रमांक | नेमणुक | जन्म दिनांक | वयाची ५८ वर्ष पुर्ण केल्याचा दिनांक | नियत वयोमान सेवानिवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | देवराव भाऊराव डकरे | सपोउपनि, बक्कल क्रमांक ८० | पोलीस मुख्यालय | २०/०४/१९६६ | २०/०४/२०२४ | ३०/०४/२०२४ |
| २. | दिपक बाबुलाल श्रीवास | पोहवा बक्कल क्रमांक ८२९ | पोलीस मुख्यालय | ०४/०४/१९६६ | ०४/०४/२०२४ | ३०/०४/२०२४ |

१/- वरिल नमूद पोलीस अंमलदार यांना दिनांक ३०.०४.२०२४ चे मध्यान्होत्तर पासून प्रभारी पोलीस अधिकारी यांनी शासकिय सेवेतुन मुक्त करावे.

२/- प्रभारी पोलीस अधिकारी यांनी सदर पोलीस अंमलदार यांच्या ताब्यातील शासकिय निवासस्थाने त्वरीत रिक्त करण्याची कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

३/- वरिल नमूद पोलीस अंमलदार यांना शासकिय सरंजाम, किट, ओळखपत्र पोलीस मुख्यालयातील वस्त्र भांडार मध्ये जमा करुन प्रभारी पोलीस अधिकारी यांनी तसे या कार्यालयास कळवावे.

## भाग-३

## वेतन/संरचना/वेतन निश्चितीती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण

## संकीर्ण

**०१.पोआअश/लेखा शाखा/अतिप्रदान वसुली/से.नि. सपोउपनि २०७-चंदु बुंदेले/३७८०/२०२४, अमरावती शहर दिनांक १८/०३/२०२४**

**संदर्भ :-** १. पोआअ/विचौ-२/पगार बंद/पो.हवा. २०७ बुंदीले+१/८३९५/२०२१,दि.१२/१०/२०२१

२. पोआअश/विचौ/निलंबन/सपोउपनि/२०७ चंदु बुंदेले/६८१२/२०२३, दिनांक १३/०६/२०२३

३. आदेश क्र. पोआअ/विचौ-१/नि.का.अ.आ/सपोउपनि-२०७/चंदू बुंदेले/८६५३/२०२३, दिनांक २७/०७/२०२३.

## आदेश

सपोउपनि २०७ चंदु बंदेले तत्कालिन नेमणूक पो.स्टे.गाडगेनगर येथे गैरहजर असल्यामुळे या कार्यालयाचे आदेश क्र.पोआअ/विचौ-२/पगार बंद/पो.हवा.२०७ बुंदीले+१/८३९५/२०२१, दिनांक १२/१०/२०२१ अन्वये त्यांचे माहे १०/२०२१ पासुन बंद करण्यांत आले होते. त्यामुळे त्यांचे वेतना मध्ये सुरु असलेली अतिप्रदान रकमेची वसुली करता आलेली नाही. कार्यालयीन आदेश क्र. पोआअश/विचौ/ निलंबन/ सपोउपनि/२०७ चंदू बुंदेले/६८१२/२०२३, दिनांक १३/०६/२०२३ अन्वये त्यांना निलंबित करण्यांत येवून दिनांक १३/०६/२०२३ चे आदेशान्वये त्यांना निलंबनातुन मुक्त करण्यांत आले होते. तसेच संदर्भाकित आदेश

क्र.३, दिनांक २७/०७/२०२३ अन्वये त्यांचा दिनांक २८/०९/२०२० ते १२/०६/२०२३ पर्यंतचा ९८७ दिवसांचा अनधिकृत गैरहजेरीचा कालावधी असाधारण रजा (विनावेतन रजा) मंजुर करण्यांत आला आहे.व दिनांक १३/०६/२०२३ ते दिनांक १४/०४/२०२३ पर्यंतचा निलंबन कालावधी जशाचे तसा ठेवण्यांत आला आहे. निलंबन कालावधी मध्ये त्यांना अतिप्रदान झाले असुन एकुण वसुल करावयाच्या रकमेचा तपशिल खालील नमुद प्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **वसुलीचा तपशिल व कालावधी** | **रक्कम रुपये** | **अभिप्राय** |
|---|---|---|---|
| १ | सण अग्रिम २०२१-२२ | १२५०० | माहे ०९/२०२१ पासुन वेतन बंद असल्याने वसुली करण्यांत आलेली नाही |
| २ | सण अग्रिम २०२२-२३ | १२५०० | वरील प्रमाणे |
| ३ | अतिप्रदान रकमेची वसुली-१ | ४५५००० | माहे ०९/२०२१ पावेतो वेतनामधुन दरमहा रु. ५०००/- या प्रमाणे ११६ किस्तीपैकी २३ किस्त वसुल झाल्या असुन, माहे ६/२३ व ७/२३ मध्ये २ किस्ती वसुल झाल्या आहेत. उर्वरित ९१ किस्त वसुल करणे बाकी आहेत. |
| ४ | अतिप्रदान रकमेची वसुली-२ | २४४२१ | माहे ०६/२०२३ चे वेतनामधुन ०१/०६/२०२३ ते १२/०६/२०२३ पर्यंत झालेले वेतनाचे अतिप्रदान |
| ५ | अतिप्रदान वसुली-३ | १६७२६ | माहे ०६/२०२३ चे वेतनामध्ये १३/०६/२०२३ ते ३०/०६/२०२३ पर्यंत झालेले अतिप्रदान |
| ६ | अतिप्रदान वसुली-४ | १३५४५ | माहे ७/२०२३ चे वेतनामधुन दिनांक ०१/०७/२०२३ ते १४/०७/२०२३ पर्यंत झालेले अतिप्रदान |
| **एकुण वसुली** | | **५,३४,६९२** | |

उपरोक्त अतिप्रदान रकमेपैकी सपोउपनि २०७ चंदु बुंदेले यांना झालेल्या अतिप्रदान रक्कम रु.५,३४,६९२/- एवढया रक्क्मेपैकी त्यांचे अंतिम रजा रोखीकरणाची अनुज्ञेय रक्कम रु.२,४८,७८४/- एवढी रक्कम व सातव्या वेतन आयोगानुसार अनुज्ञेय थकबाकीच्या दोन हप्त्यांची रक्कम रु.७३,८७६/- एकुण रक्कम रु. ३,२२,६६०/- शासन जमा करण्यांत यावी.

**२.पोआअश/प्रलि-आस्था/जुनी पेंशन योजना/३१५८/२०२४, अमरावती शहर दिनांक २२/०३/२०२४**

## आदेश

शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक संकीर्ण-२०२३/प्र.क्र.४६/सेवा-४ दिनांक २.२.२०२४ अन्वये दिनांक १.११.२००५ पुर्वी पदभरती जाहिरात/अधिसुचना निर्गमित झालेल्या प्रकरणी शासन सेवेत दिनांक १.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर रुजु झालेल्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२, म+हाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण ) १९८४ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी व अनुषंगिक नियमाच्या तरतुदी लागु करण्यात आल्या आहेत. तसेच संबंधीत राज्य शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचे राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली मधील खाते नियुक्ती प्राधिका-याने तात्काळ बंद करुन जे राज्य शासकीय अधिकारी/कर्मचारी जुनी निवृत्ती वेतन व अनुषंगिक

नियम लागु करण्याचा पर्याय निवडतील त्यांचे भविष्य निर्वाह निधीचे (GPF) खाते उघडण्यात येवुन त्यामध्ये त्यांच्या राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणाली (NPS) च्या खात्यातील त्यांच्या हिश्श्याची रक्कम व्याजासह जमा करण्यात यावी.तसेच त्यांच्या राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणाली (NPS) मधील राज्य शासनाच्या हिश्श्याची रक्कम व्याजासह राज्याच्या एकत्रित निधीत वळती करण्याची कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

अमरावती शहर आस्थापनेवर दिनांक १०.२.२००४ पासुन ९३ पदाकरीता पोलीस भरती घेण्यात आली होती. सदर भरती प्रक्रीयेची जाहिरात दिनांक ९.१.२००४ रोजी वृत्तपत्रात प्रकाशित करण्यात आली असुन सदर भरती प्रक्रीयेच्या लेखी परीक्षेमध्ये अनियमीतता झाल्याने सदर भरती प्रक्रीया मा.अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्रमांक टिआरजी/पोलीस रिक्रुटमेंट/अमरावती सीटी/२००४/९५३, दिनांक १९.६.२००४ अन्वये रद्य करुन नव्याने पोलीस भरती प्रक्रीया राबविण्याबाबत निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार पोलीस भरती प्रक्रीया रद्य करुन नव्याने भरती प्रक्रीया राबविण्याबाबतची कार्यवाही सुरु केल्याने सदर भरती प्रक्रीयेतील उमेदवारांनी मा.उच्च न्यायालय खंडपिठ नागपुर येथे रिट पिटीशन क्रमांक ५४०२/२००४ आणि ५५९६/२००४ अन्वये याचिका दाखल केल्या. प्रस्तुत प्रकरणामध्ये मा.उच्च न्यायालय खंडपिठ नागपुर यांनी दिनांक ६.२.२००८ रोजी न्यायनिर्णय देवुन लेखी परीक्षेपासुन पुन्हा भरती प्रक्रीया राबविण्याबाबत आदेशित केले आहे. त्याअनुषंगाने दिनांक ३.८.२००८ रोजी लेखी परीक्षा घेण्यात आली असुन त्यामध्ये उत्तीर्ण व पात्र उमेदवारांची वैयक्तीक मुलाखत घेवुन दिनांक २१.८.२००८ रोजी प्रवर्ग निहाय जाहिरातीनुसार उमेदवारांची निवड यादी प्रसिध्द करण्यात आली. सदर भरती प्रक्रीयेमधील खालील नमुद ०६ उमेदवरांची निवड करण्यात येवुन त्यांना दि. १.९.२००८ चे आदेशान्वये त्यांना पोलीस शिपाई पदाच्या रिक्त पदामध्ये प्रत्यक्ष नियुक्त्या देण्यात आल्या आहेत.

उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे सदर भरती प्रक्रीयेतील नियुक्ती देण्यात आलेल्या खालील नमुद ६ पोलीस अंमलदार यांनी शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक संकीर्ण-२०२३/प्र.क्र.४६/सेवा-४ दिनांक २.२.२०२४ मधील तरतुदीनुसार जुनी निवृत्ती वेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२, म.ना.से.(अंशराशीकरण) नियम १९८४ व भविष्य निर्वाह निधी नियम १९९८ लागु करण्याचा विकल्प (Option) विहीत ६ महिन्याचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयास दिला आहे. त्याअनुषंगाने खालील नमुद ६ पोलीस अंमलदारांना जुनी निवृत्ती वेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२, म.ना.से.(अंशराशीकरण) नियम १९८४ व भविष्य निर्वाह निधी नियम १९९८ त्यांचे नियुक्ती दिनांकापासुन लागु करण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **पोलीस अंमलदारांचे नाव व पदनाम** | **सद्याची नेमणुक** | **नियुक्ती आदेश दिनांक** |
|---|---|---|---|
| १. | मपोना/१४५९, सिमा रामदास गवई | श.वा.शा.(पश्चिम) | १.९.२००८ |
| २. | पोशि/१४४०, अरुण चिंतामण वर्धे | सेवानिवृत्त | १.९.२००८ |
| ३. | पोना/१४३९,प्रदिप रामकृष्ण लोणारे | शवाशा (पुर्व) | १.९.२००८ |
| ४. | पोना/८५१,(जुना ब.नं.१४१६) तुषार बाबुराव देशमुख | पो.स्टे.गाडगेनगर | १.९.२००८ |
| ५. | मपोना/१४७०, सुचिता शामरावजी राणे | पोलीस मुख्यालय | १.९.२००८ |
| ६. | पोनि/श्रीमती शिल्पा विनायकराव भरडे ( तत्कालीन मपोशि/ब.क्र.१४५८ ) | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अमरावती. | १.९.२००८ |

उपरोक्त नमुद पोलीस अंमलदारांना जुनी निवृत्ती वेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ लागु झाल्याने त्यांचे भविष्य निर्वाह निधी खाते उघडुन राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणाली (NPS) मधील जमा असलेली त्यांचे हिश्श्याची रक्कम नियमाप्रमाणे भविष्य निर्वाह निधीमध्ये जमा करण्यात येत आहे. तसेच त्यांच्या राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणाली (NPS) मधील राज्य शासनाच्या हिश्श्याची रक्कम व्याजासह राज्याच्या एकत्रित निधीत वळती करण्यात येत आहे.

**(कल्पना बारवकर)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,

पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस